श्रीम सविता शिवराम लांडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निबळक, ता. अहिल्यानगर यांचे गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/2310684 /२०२६

दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.गटविकास अधिकारी पंचायत अहिल्यानगर यांचे कडील दोषारोप पत्र क्र.आस्था-२/ ११४२/२०२५,दिनांक ३१/१०/२०२५.

२. गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचे कडील दोषारोप पत्र क्र. आस्था-२/१२२२/२०२५, दिनांक १४/११/२०२५.(सुधारीत दोषारोप)

३.या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्र.ग्रापं-३/२११९२४७/२०२६, दिनांक २१/०१/२०२६

४.गटविकास अधिकारी पंचायत समिती,अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/२२६/२०२६, दि.०९/०३/२०२६. (ज्ञापन पोहोच दि.२३.०१.२०२६)

५. श्रीम सविता शिवराम लांडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत निंबळक, ता. अहिल्यानगर यांचा खुलासा दिनांक ०९/०३/२०२६ (प्राप्त दिनांक १०/०३/२०२६)

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

ज्याअर्थी, श्रीम सविता शिवराम लांडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निंबळक, ता. अहिल्यानगर येथे कार्यरत असताना गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.०३ अन्वये एकुण ०७ दोषारोप ठेवण्यात आले होते. श्रीम लांडे यांनी संदर्भ क्र.५ नुसार दोषारोपांचा खुलासा सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले सर्व आरोप अमान्य केलेले आहेत.

सबब, श्रीम सविता शिवराम लांडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निंबळक, ता. अहिल्यानगर यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्रीम सविता शिवराम लांडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निंबळक, ता. अहिल्यानगर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात

चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेवतीने श्री खाडे चंद्रकांत निवृत्ती, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती अहिल्यानगर यांची नियुक्ती करीत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्रीम सविता शिवराम लांडे यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणीचे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202604171060065 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 17-04-2026 13:21:42

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. सहा.आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/-सोबत श्रीम सविता शिवराम लांडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निंबळक, ता. अहिल्यानगर यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

२. श्री खाडे चंद्रकांत निवृत्ती, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती अहिल्यानगर.

व्दारा व प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.

२/- सोबतचा आदेश श्रीम सविता शिवराम लांडे, ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

४. निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर